कार्यमुक्त व रुजू अहवाल सादर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय, लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र राज्य, मुंबई
तळ मजला, कस्तुरी इमारत, पेट्रोलियम हाऊस समोर,
जमशेदजी टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई-४०००२०.

दुरध्वनी क्रमांक ०२२-२२८८०१०६/०७ ईमेल आयडी ad.admin@mahakosh.in

संदर्भ : वित्त विभाग आदेश क्र. संलेको-२०२४/प्र.क्र.२००/कोषा प्रशा-२. दि.१५-०१-२०२५

क्र.संलेको/प्रशा-राप/ का-२/नादेकृसंप्र/ 107 31 JAN 2025

# -: परिपत्रक :-

जागतिक बँक अर्थ सहाय्यित नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पात कार्यरत क्षेत्रीय स्तरावरील नियमित अधिकारी/ कर्मचारी यांच्या सेवा प्रकल्प टप्पा -१ ची प्रलंबित कामे पूर्ण करण्याकरिता पुढे चालू ठेवण्याबाबतच्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प यांचे प्रस्तावाचे अनुषंगाने कृषी विभागाच्या दि.१२-०८-२०२४ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा लेखा अधिकारी संवर्गातील ३६ पदांना देण्यात आलेली मुदतवाढ दि.३१-१२-२०२४ रोजी संपुष्टात आली आहे.

त्यामुळे नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत क्षेत्रीय स्तरावर महाराष्ट्र लेखा व वित्त सेवेतील लेखा अधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांना वित्त विभागाचे संदर्भीय आदेशान्वये सुधारित पदस्थापना देण्यात आल्या आहेत.

त्यानुषंगाने सदर आदेशातील नमूद अधिकाऱ्यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी संचालनालयाचे दि.२२-०६-२०२२ रोजीच्या परिपत्रकानुसार संबंधित विभागीय सहसंचालक, लेखा व कोषागार/ जिल्हा कोषागार कार्यालयातून कार्यमुक्त झालेबाबतचे तसेच सुधारित पदस्थापना देण्यात आलेल्या पदावर रुजू झालेबाबतचे अहवाल संचालनालयाच्या aotransfer२०२४@gmail.com या ई-मेल वर तात्काळ सादर करावेत.

(रश्मी नांदिवडेकर)
सहसंचालक (प्रशासन)
लेखा व कोषागारे, मुंबई

प्रत अग्रेषित:

१. सहसचिव (कोषा प्रशा.२), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
२. सहसंचालक, लेखा व कोषागारे (अमरावती, नागपूर, छत्रपती संभाजीनगर,नाशिक)
३. सहसंचालक, लेखा व कोषागारे (अमरावती, नागपूर, छत्रपती संभाजीनगर,नाशिक) यांचे अधिनस्थ सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय.
४. संबंधित अधिकाऱ्यांचे नियुक्तीच्या पदावरील नियंत्रक अधिकारी व कार्यालय प्रमुख.
५. संबंधित अधिकारी.